माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ४७८३+४७८४+४७८५+४७८७++५९०७+५९०८/२०२४/ सांगली

राज्य माहिती आयोग,खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| सलमान मुस्तफा बेग | १.कनिष्ठ लिपीक, प्रभाग समिती क्र.१,२,३व ४, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका, सांगली<br>२. कनिष्ठ लिपीक, बांधकाम विभाग, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका, सांगली | १.सहायक आयुक्त, सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका, सांगली |

### ( सुनावणी दिनांक - १३/०६ /२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि.०१.१०.२०२४, दि.०९.०८.२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये एकूण ६ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत. तथापि त्यांचे लेखी निवेदन आयोगास प्रापत आहे.

अपिलार्थी यांनी दि.१३.०६.२०२५ रोजी द्वितीय अपिल क्र ५९०७-२०२४ व ५९०८-२०२४ निकाली काढणेबाबत आयोगास लेखी निवेदन सादर केले आहे.

सबब, अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपिलांमध्ये कोणतेही तथ्य किंवा गुणवत्ता आढळून येत नसल्यामुळे व त्यातून कोणतेही जनहित साध्य होत नसल्यामुळे, तसेच अपिलार्थी हे सुनावणीस गैरहजर आहेत त्यामुळे त्यांना अपिलामध्ये कोणतेही स्वारस्य नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने दाखल केलेले

द्वितीय अपिल निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांची प्रस्तुत ६ द्वितीय अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे..

जावक क्र. :- ४७८३+४७८४+४७८५+४७८७++५९०७+५९०८/२०२४/ सांगली दिनांक - 21 /8/2025

9028/2025